26

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्रमांक-हिंभाप-१०८३-१४४८-वीस,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक:- १७/१२/८३.

पहा:-१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-हिंभाप-१९७६-२८, दिनांक १०-६-१९७६.
२) निर्णय क्रमांक-हिंभाप-१०८०-१३१-वीस, दिनांक २५-५-१९८१.

शासन निर्णय:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-हिंभाप-१९७६-२८, दिनांक १०-६-१९७६ अन्वये शासकीय अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी एतदर्थ मंडळाच्या हिंदीच्या निम्न व उच्च श्रेणी परीक्षा उत्तीर्ण आवश्यक आहे. माध्यमिक शालांत परीक्षा, हिंदी हा विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-हिंभाप-१०८०-१३१-वीस, दिनांक २५-५-१९८१ च्या अनुच्छेद(१) अन्वये एतदर्थ मंडळाच्या हिंदीच्या निम्न व उच्चश्रेणी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आली आहे.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-हिंभाप-१०८०-१३१-वीस, दिनांक २५-५-१९८१ च्या अनुच्छेद (१) मधील आदेशाच्या संदर्भात माध्यमिक शालांत परीक्षा नविन अभ्यासक्रमाप्रमाणे हिंदी-संस्कृत, हिंदी-मराठी, हिंदी-उर्दू इ.असा संयुक्त विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या अधिकाऱ्याला/कर्मचाऱ्याला एतदर्थ मंडळाच्या हिंदीच्या निम्न व उच्च श्रेणी परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देता येईल काय असा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. यासंबंधात असा खुलासा करण्यात येत आहे की माध्यमिक शालांत परीक्षेच्या हिंदी संयुक्त विषयाचा दर्जा एतदर्थ मंडळाच्या हिंदी निम्न व उच्च श्रेणी परीक्षेच्या समकक्ष नसल्यामुळे माध्यमिक शालांत परीक्षा हिंदी हा संयुक्त विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या अधिकाऱ्याला/कर्मचाऱ्याला एतदर्थ मंडळाच्या हिंदी निम्न व उच्च श्रेणी

परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देता येणार नाही. मात्र माध्यमिक शालांत परीक्षा निम्नश्रेणी वा उच्चश्रेणी हिंदी विषय घेऊन १०० गुणांची परीक्षा उत्तीर्ण होणा-या अधिका-याला/कर्मचा-याला एतदर्थ मंडळाच्या हिंदी निम्न व उच्चश्रेणी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(र.रा.कुलकर्णी)
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,